INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.261

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

October-November-December-2018

Vol. 5 Issue 4

Chief Editor :

Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

This Journal is indexed in :

- University Grants Commission (UGC)
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

RESEARCH JOURNEY

| | | | |
|---|---|---|---|
| | | प्रा. प्राची जोशी | 403 |
| 92 | बेरिस्टर अनिरुध्द धोपेश्वरकर (मराठीतील अतिवास्तववादी कादंबरी) | प्रा. संजय भालेराव | 415 |
| 93 | भारतीय लोकशाहीत माहितीचा अधिकार आणि सुशासन | | |
| 94 | कर्जत तालुक्यातील बचत गटांच्या वित्त पुरवठ्याचा अभ्यास जिल्हा अहमदनगर | प्रा. वनदास पुंड | 419 |
| 95 | आचार्य कौटिल्या यांची सार्वजनिक करव्यवस्था आणि वर्तमानकालीन प्रासंगिकता | प्रा. हेमराज चौधरी | 422 |
| | | डॉ. भूषण बंड | 425 |
| 96 | पाहिजे जातीचे या नाटकातील जीवनभाष्य | डॉ. स्वाती काळभोर | 428 |
| 97 | औंध संस्थांनातील चित्रकलेचा ठेवा | डॉ. सुधीर सहारे | 433 |
| 98 | योग आणि आसनांचे महत्त्व व फायदे | प्रा. जी. जी. राऊलवाड | 437 |
| 99 | २१व्या शतकात महात्मा गांधींच्या विचारांची प्रस्तुतता | प्रा. अरविंद पाटील | 439 |
| 100 | उत्क्रांत लेणी मानवी जीवनमूल्यांचा उजेडनामा | डॉ. अंजली मस्करेन्हस | 443 |
| 101 | आदिवासी चित्रकला : लग्न चौक | डॉ. विमल राठोड | 449 |
| 102 | परंपरागत भारतीय राज्य व्यवस्थेचा जगावर परिणाम | | |
| 103 | भारतीय शिक्षण पद्धतीत आदिवासी जमातीच्या पाल्यांच्या शैक्षणिक समस्या व उपाय योजना | डॉ. नासिर गिरासे | 452 |
| 104 | आधुनिक महाराष्ट्रातील शिक्षणाच्या बहुजनीकरणात महात्मा फुले यांची भूमिका | प्रा.कल्याण वटाणे व प्रा.एच.पी.भैलुमे | 455 |
| | | डॉ.शामराव गायकवाड | 458 |
| 105 | मुस्लिम व मुस्लिम मराठी साहित्य संकल्पना | डॉ.भूषण बंड | 462 |
| 106 | लोकसाहित्य:संकल्पना, स्वरूप व प्रयोजन | डॉ.सुरेश बन्सपाल | 465 |
| 107 | भारतातील शहरी अर्थव्यवस्थेचा अभ्यास | डॉ.प्रल्हाद होंडे | 470 |
| 108 | स्त्रीवादी काव्याचा अभ्यास | डॉ.सदाशिव सरकटे | 475 |
| 109 | महानुभाव पंथाचे प्रवर्तक : महात्मा चक्रधर स्वामी | महेश घाडगे | 479 |
| 110 | माळशिरस तालुक्यातील सहकारी चळवळ | डॉ.बाबाराव ठावरी | 484 |
| 111 | सखाराम बाइंडर : एक दृष्टीक्षेप | | |
| 112 | भारतातील विदेशी भांडवल व परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक | डॉ.अंकुश जाधव व प्रा.विलास उमरे | 491 |
| 113 | १९९० नंतरच्या ग्रामीण साहित्यातून व्यक्त झालेली ग्रामजीवनाची जळजळीत वास्तवता | डॉ.संगीता शेळके | 499 |
| 114 | संगोल्यातील डाळींब | महेश घाडगे | 502 |


## कोंकणी विभाग


| | | | |
|---|---|---|---|
| 115 | 'कोंकणी साहित्यातलो विनोद : एक सरियस चिकित्सा'(वेंचीक साहित्याचे शास्त्रीय तशेच ऍकडेमिक विश्लेशण) | डॉ.हनुमंत चोपडेकार | 505 |
| 116 | र.वि.पंडिताचे कवितेंतलो व्यक्तिगत जिणे-प्रभाव | डॉ.राजय पवार | 515 |
| 117 | डॉ.राजय पवार ह्यांच्या ओली सुकी ललित निबंदातली आशयात्मक अभिव्यक्ती | प्रा.प्रियांका परब | 525 |


## उर्दू विभाग


| | | | |
|---|---|---|---|
| 118 | جنوبی ہند میں اردو ناول کی ایک معتبر اواز---نور الحسنین | محمد ابرار الحق عبدالظاہر امجد | 533 |
| 119 | (احساس زن کا آئینہ خانہ) عصمت چغتائی کے ناول | ڈاکٹر قریشی عتیق احمد | 537 |


*या विशेषांकाचे सर्व अधिकार प्रकाशकांनी स्वत:कडे राखून ठेवलेले आहेत. लेखांचे प्रकाशन वा पुनर्प्रकाशनाचे अधिकार प्रकाशक आणि संबधित लेखाकाधीन समान असून शोध निबंधातील मते ही संबधित लेखाच्या लेखकांची वैयक्तिक मते आहेत त्या मताशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.*

# आचार्य कौटिल्य यांची सार्वजनिक कर व्यवस्था आणि वर्तमानकालीन प्रासंगिकता

प्रा.हेमराज चौधरी
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आर्वी, जि. वर्धा.
मो.न. ९०९६९२११४२
ई.मेल – hemchou3@gmail.com

## प्रस्तावना :

भारतीय प्राचीन विचारानुसार धन हे जीवनाचे साध्य नाही, तर साधन आहे. धर्म, अर्थ, काम व मोक्ष यातील मोक्ष हे साध्य आहे आणि इतर साधने आहेत. उत्पादन, वितरण तथा विनिमय इत्यादी आर्थिक क्रियांमध्ये मनुष्य इमानदार, उदार व न्यायपुर्ण राहीला पाहिजे ही अपेक्षा व्यक्त केली आहे. भारतीय आर्थिक विचारांची विशेषत: म्हणजे ते वैज्ञानिक न राहता नैतिक व व्यावहारीक आहे. भारतीय विचारवंतांनी शोषण व आर्थिक विषमतेला नेहमीच वाईट ठरविले आहे. अनादीकाळापासून दान, उदारता, दयाळुपणा यांचे महत्व सांगितले आहे. भारतीय प्राचीन इतिहास ऋषी दधिच, हरिशचंद्र, कर्ण यासारख्या दानशूर व्यक्तींनी ओतप्रोत भरलेला आहे.

भारतीय आर्थिक विचारांच्या इतिहासात आचार्य कौटिल्य यांचे स्थान सर्वोच्च आहे. कौटिलीयम अर्थशास्त्रम भारतीय हिंदु राजनीतीचा सर्वश्रेष्ठ ग्रंथ आहे. कौटिल्याचे आदर्श राज्य प्लेटोच्या आदर्श राज्याप्रमाणे काल्पनिक नाही तर एक व्यावहारीक राज्य आहे. राजाने सर्व समंतीने राज्य कारभार चालवावा अशी अपेक्षा केली जाते, त्याप्रमाणेच कौटिल्याचे विधान होते की, राजाने मंत्रीपरिषदेच्या बहुमताने कारभार करावा. शिवाय अनुपस्थितीत मंत्र्यांची मते पत्राद्वारे मागवावीत. राजाने आपल्या प्रजेसोबत अशाप्रकारे व्यवहार करावा जसा एखादी पिता आपल्या मुलांसोबत वागतो. थोडक्यात आचार्य कौटिल्य यांचे राज्य कारभारविषयक विचार आदर्शवादी तथा व्यावहारीक आहे.

## उद्देश आणि संशोधन पद्धती :

प्रस्तुत शोधनिबंधातून आचार्य कौटिल्यांचा आर्थिक विचारांतर्गत त्यांच्या सार्वजनिक आय आणि कर व्यवस्थेचा विचार करण्यात आला आहे. शोधनिबंधासाठी दुय्यम स्त्रोतांचा विचार केला आहे.

## सार्वजनिक वित्ताचे स्त्रोत :

प्राचीन भारतीय राज्यशास्त्रज्ञांमध्ये कौटिल्याचे स्थान महत्वपूर्ण आहे. त्यांना शासनकला तथा कुटनितीचे महान विचारक मानले जाते. कौटिल्य यांनी धनाला महत्वपुर्ण स्थान दिले आहे. त्यांच्या मते धन मनुष्याच्या जीवनाचा आधार आहे. म्हणूनच साम्राज्यविस्तार करतांना आणि साम्राज्य टिकवितांना धन गरजेचे आहे, असे ते सांगतात. म्हणूनच आपल्या अर्थशास्त्र ग्रंथात कौटिल्य यांनी राज्यासाठी अधिकाधिक धनप्राप्ती कशी करता येईल यासाठी उत्पनाचे विभिन्न स्त्रोत सांगितलेले आहे. शिवाय राज्याचा कोष नेहमी कसा भरुन राहील याची काळजी घेतली आहे. कौटिल्य यांचे मतानुसार साम्राज्याचे सर्वोच्च राजस्व पदाधिकारी *समाहर्ता व सन्निधाता* आहेत. समाहर्ता विभिन्न स्त्रोतांद्वारे प्राप्त उत्पन्न एकत्र करीत असे. शिवाय उत्पन्न वाढीसाठी नवीन नवीन स्त्रोतांचा शोध घेणे हे त्याचे कार्य होते. *सान्निधाता* त्याचा पूरक अधिकारी होता. कोष सांभाळण्याची जबाबदारी त्याची होती. या दोन्ही पदांच्या खाली परंतु व्यापक अधिकारप्राप्त व्यक्ती म्हणजे अक्षरपटलाध्यक्ष होय. त्याला आजच्या युगात अकाउंटंट जनरल म्हणता येते. उद्योग, जंगले, खाणी, मासेमारी आणि व्यापार यामध्ये सरकारचा सहभाग असावा असे कौटिल्याचे मत होते. यावरुन कौटिल्याचे विचार आधुनिक समाजवादी विचारांशी मिळते–जुळते होते, असे म्हणता येते. सरकारचा सहभाग असलेल्या क्षेत्रातून उत्पन्न मिळतेच. परंतु त्या व्यतिरिक्त सरकारने कराद्वारे उत्पन्न मिळविले पाहिजे. त्याकरीता उत्पन मिळविण्याचे अनेक मार्ग कौटिल्याने आपल्या ग्रंथात सांगितले आहे.

आचार्य कौटिल्य यांनी राज्याच्या आय स्त्रोताचे दोन भागात वर्गीकरण केले आहे. *आय शरीर* व आयमुख. आयशरीर नामक वर्गात *दुर्ग, राष्ट्र, खान, सेतू, वन, व्रज* तथा *वणिक पथ* या साधनांद्वारा प्राप्त उत्पन्नाचा उल्लेख केला आहे.

**दुर्ग** – जकात, दंड, वजने व मापे यांच्यापासूनचे उत्पन्न, नाणी पाडणारा अध्यक्ष, तेल, तुप, गुळ यांच्या विक्रीपासूनचे उत्पन्न, सुवर्णकार, बाजारपेठा, वेश्या, जुगार, कारागीर, कलाकार यांच्यापासून घ्यावयाचा कर या सर्व बाबींचा समावेश दुर्ग या सदरात होतो.

**राष्ट्र** – सरकारी शेतीचे उत्पन्न, खासगी शेतीच्या उत्पनाचा हिस्सा, खंडणी, कर, व्यापाऱ्यांवरील कर, नदी रक्षक, बंदरे, कुरणे यापासून मिळणारे उत्पन्न याबाबी राष्ट्र या सदरात मोडतात.

**खनि** – सोने, रुपे, हिरे, रत्ने, मोती, शंख, इतर धातू, लवण आणि भूमीत, दगडात व प्रवाही पदार्थात आढळणारे धातू खनी या सदरात येतात.

**सेतु** – फुलबागा, फळबागा, भाज्यांचे मळे, पानथळ जमीनीतील लागवड आणि मुळ लावून केलेली लागवड यापासूनचे उत्पन्न सेतू सदरात येते.

**वन** – पशूसाठी अरण्य, मृगारण्य, द्रव्यवन व हस्तीवन हे वन या सदरात मोडतात.

**व्रज** – गाई–म्हशी, शेळया –मेंढया, गाढव, उंट, घोडे–खेचरे यांच्यापासूनचे उत्पन्न व्रज या सदरात येते.

**वाणिक पथ** – स्थलमार्ग व जलमार्ग यांच्यापासूनचे उत्पन्न या सदरात येते.

कौटिल्य यांनी उत्पनाच्या अन्य साधनांना *आय मुख* या श्रेणीत ठेवले. यात *मूल, भाग, व्याजी, परिधी, रुपिक, कलुप्त* व *अत्यय* इत्यादींचा समावेश आहे. या अंतर्गत राज्याच्या मालकीच्या आणि नियंत्रणात असलेल्या अनेक वस्तूंच्या विक्रीवरील कर, व्यापाऱ्यांद्वारे होणाऱ्या क्रय विक्रयापासून प्राप्त उत्पन, दुकानदारांद्वारा वजन मापात बेईमानी केल्यामुळे करण्यात येणारा आर्थिक दंड, याशिवाय नट, नर्तकी यांच्याकडून प्राप्त धनराशी इत्यादीचा समावेश आयमुख सदरात होतो.

आपातकालीन वित्त व्यवस्था :

याशिवाय कौटिल्याने सार्वजनिक वित्ताच्या संदर्भात तथा आपातकालीन स्थितीसाठी काही महत्वपुर्ण कर सिद्धांताचा उल्लेख केला आहे. याअंतर्गत आठ प्रकारच्या स्त्रोतांपासून प्राप्त उत्पनाचा समावेश करण्यात आला आहे.

- जो भाग उत्पादनाच्या बाबतीत संपन्न आहे, त्यांच्याकडून अन्नधान्याच्या १/३ किंवा १/४ भाग भूमीकराच्या स्वरुपात घेतला जावू शकतो.
- कृषीबीज सोडून अन्य शेतमाल धन देवून खरेदी केला जावू शकतो.
- समाहर्ता शेतकऱ्यांना समजावून सांगून कमी कालावधीत तयार होणाऱ्या शेतमालाचे उत्पादन करण्यास सांगू शकतो.
- वनातून प्राप्त उत्पनाचा १/६ कराच्या रुपात सरकारी कोषात जमा करु शकतो.
- सोने, चांदी, हिरे जवाहरात व्यापाऱ्यांकडून विशेष परिस्थिती अंतर्गत कराची मागणी केली जावू शकते.
- गायी– म्हशी, बकरी पाळणाऱ्यांकडून धनाची मागणी केली जावू शकते.
- देवताध्यक्ष (धार्मिक संस्थाचे अधिक्षक) सुद्धा धनसंग्रहणात राज्याची सहाय्यता करु शकते शिवाय आवश्यकता पडल्यास धन एकत्र करण्यासाठी गुप्तचरांचीही सहाय्यता घेतली जावू शकते.

वर्तमानकालीन प्रासंगिकता :

भारतीय राजनिती शास्त्रज्ञांमध्ये आचार्य कौटिल्य यांचे स्थान निश्चितच श्रेष्ठ आहे. त्यांनी प्राचीन काळात व्यक्त केलेले विचार आजच्या राजकीय वातावरणात निश्चितच उपयुक्त आहे. कोणतेही राज्य पैश्याशिवाय टिकाव धरु शकत नाही, सामर्थ्यशाली होवू शकत नाही हे त्यांचे विचार आज सर्व राष्ट्रांनी मान्य केलेले आहे, म्हणूनच आधुनिक काळाच्या सुरुवातीपासूनच वसाहतवादी साम्राज्यविस्तार घडवून आणण्यावर

बहुतांश शक्तीशाली राष्ट्रांनी भर दिला. आर्थिकदृष्ट्या संपन्न राष्ट्रे इतर राष्ट्रांवर वचक ठेवू शकतात, हे कौटिल्याचे विचार आज संपूर्ण जगाला मान्य आहे. कल्याणकारी राज्याची निर्मिती करतांना सार्वजनिक क्षेत्रात उद्योगांची स्थापना झाली पाहिजे हा कौटिल्याचा विचार आधुनिक समाजवादाचे विचार स्पष्ट करतो. त्यामुळेच स्वातंत्र्योत्तर काळात भारतात बहुतांश उद्योग सार्वजनिक क्षेत्रात सुरु करण्यात आले. यासोबतच खाजगी क्षेत्रातसुद्धा उद्योगनिर्मितीला चालना दयावी असे कौटिल्य सुचवितात. यावरुन भारताने जी मिश्र अर्थव्यवस्थेची विचारसरणी स्विकारली, ती स्विकारतांना भारतीय आर्थिक विचारवंतानी कौटिल्यीय आर्थिक विचारांचा आधार घेतला असावा, असे म्हणता येते. सार्वजनिक वित्ताच्या संदर्भात कर हे सरकारी उत्पन्नाचे प्रमुख साधन असुन कराच्या दरांमध्ये लवचिकता ठेवून आर्थिक आणीबाणीचा सामना समर्थपणे कसा करावा याचा विचार आचार्य कौटिल्य यांनी केला आहे. वर्तमानकाळात कर हे सार्वजनिक उत्पन्नाचे प्रमुख साधन आहे, शिवाय कर दरांमध्ये लवचिकता आहे. राज्य सामर्थ्यशाली बनण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने त्याच्या दायीत्वानुंसार राज्याला कर दिला पाहिजे, अशी कौटिल्याची विचारसरणी आहे, त्यानुसार सरकारसुद्धा करदेय क्षमतेनुसार कर आकारणी करीत असते. कर चोरी करणाऱ्यांविरुद्ध कठोर दंडाची कार्यवाही कौटिल्य सुचवितात, त्याशिवाय कर चोरी होवू म्हणून गुप्तहेर यंत्रणेची मदत घेण्याचे विचार कौटिल्य व्यक्त करतात. त्याच प्रमाणे वर्तमानकालीन सरकारे सुद्धा कर चोरी शोधण्याचा प्रयत्न करतात. आपातकालीन परिस्थितीमध्ये राज्याची आर्थिक स्थिती ढासळू नये म्हणून आपातकालीन कर व्यवस्थेची सोय कौटिल्य यांनी सुचविली आहे. त्याप्रमाणेच वर्तमान सरकारेसुद्धा अतिरिक्त तरतुद म्हणून अधिभाराची आकारणी करतात. आवश्यकता पडल्यास शेतकऱ्यांनी कोणत्या पिकांची लागवड करावी याची सूचना सुद्धा राजा देवू शकतो. वर्तमानकाळात सरकारे सुद्धा शेतकऱ्यांना विशिष्ट पिके घेण्यासंदर्भात प्रोत्साहन देत असतात.

**सारांश :**

भौतिक जीवनाबद्दलची प्राचीन भारतीय मानसिकता त्यागाची व नैतिकतेची होती. ती आचार्य कौटिल्याने नाकारुन राज्यासाठी धन सर्वात अधिक महत्वपूर्ण मानले. जो पर्यंत राज्य धनसंपन्न होणार नाही, तो पर्यंत ते राज्य आपला वचक इतरांवर बसवू शकणार नाही. त्याकरीता राज्याने अधिकाधिक धनसंपन्न होण्याची आवश्यकता त्यांनी सांगितली. आदर्श राज्याची त्यांची संकल्पना व्यावहारिकतेवर आधारित आहे. राजाने आपल्या प्रजेशी वागले पाहिजे, अशी अपेक्षा कौटिल्य करतात.

म्हणूनच आधुनिक काळातील समाजवादी अर्थव्यवस्थेप्रमाणे सार्वजनिक मालकीच्या उद्योगांवर व सार्वजनिक नियंत्रणावर त्यांचा विश्वास होता. राज्याचा कारभार सुद्धा मंत्रीपरिषदेच्या सल्ल्यानुसार चालावा यावर कौटिल्य भर देतात. राज्याची आर्थिक बाजू सर्वात व महत्वाची असून सुयोग्य शासन चालविण्यासाठी सार्वजनिक उत्पन्न कसे मिळेल आणि त्यात कशी उत्तरोत्तर कशी वाढ करता येईल यासाठी उत्पन्नाचे विविध स्त्रोत सांगतात. याशिवाय आपातकालीन व्यवस्था म्हणून सार्वजनिक उत्पन्नात कशी वाढ करायची याचे विविध मार्ग आचार्य कौटिल्य स्पष्ट करतात.

**संदर्भ ग्रंथ :**

१. प्रा. आर. पी. कांगले (१९८२) कौटिलियम् अर्थशास्त्रम् महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ
२. प्रा. श्रीराम गोयल (१९८८) नंद–मौर्य साम्राज्याचा इतिहास, कुसुमांजली प्रकाशन, मेरठ
३. डॉ. महेशचंद्र चतुर्वेदी व डॉ. मिथिलेशचंद्र चतुर्वेदी (२००७) आर्थिक विचारांचा इतिहास, साहित्य भवन प्रकाशन, आगरा
४. बी. एम. शर्मा, रामक्रिष्णदत्त शर्मा, सविता शर्मा (२००५) भारतीय राजकीय विचारवंत, रावत प्रकाशन, जयपुर
५. प्रा. रायखेलकर, डॉ. दामजी (२०११) आर्थिक विचारांचा इतिहास, विद्या बुक्स प्रकाशन , औरंगपुरा, औरंगाबाद